UGC Approved Journal
Research Link
Since March 2002
An International, Registered & Referred Monthly Journal :
Political Science
Research Link - 166, Vol - XVI (11), January - 2018, Page No. 79-81
ISSN - 0973-1628 ■ RNI - MPHIN-2002-7041 ■ Impact Factor - 2015 - 2.782

# भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचे विश्लेषणात्मक अध्ययन

*शेतकरी आत्महत्त्या हा एक सामाजिक प्रश्न आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्त्येची अनेक कारणे आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येमुळे त्याच्या कुटुंबावर व समाजावर विपरीत परिणाम होतो. शासनाने विविध उपाययोजना केल्या असल्या तरी त्याचा कोणताच फायदा शेतकऱ्याची आत्महत्त्या थांबण्यासाठी झाला नाही. आर्थिक अडचण ही शेतकऱ्याच्या आत्महत्त्येला पर्याय होऊ शकत नाही. केवळ कर्जमाफी देवून हा प्रश्न सोडविला जाऊ शकत नाही, यासाठी शासनाने शेतीच्या समृद्धीकरीता विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. शासनाच्या उपाय योजने सोबतच शेतकऱ्यांनी स्वतःची मानसिकता बदलविणे आवश्यक आहे.*

**डॉ.प्रमोदकुमार केशव नंदेश्वर**

**प्रस्तावना :**

भारतात पुरातन काळापासून शेतीला अनन्य साधारण महत्व आहे. इ.स. पुर्व 321 ते 296 काळात कौटील्याने अर्थशास्त्र हा ग्रंथ लिहीला. या ग्रंथात शेतीतून अन्नधान्य, पशुधन, सुवर्ण वनोत्पादन या गोष्टी मिळतात. याचा उल्लेख आहे. भारतात प्राचीन काळात शेतीतून निर्माण होणा–या वस्तुची निर्यात होत असे. स्वातंत्र्य पुर्व काळात भारतात शेतीतून प्रचंड प्रमाणात कच्चा माल निर्यात व्हायचा या काळात भारत हा एक स्वयंपूर्ण देश होता, परंतु ब्रिटीशाने भारतातील कच्चा माल परदेशात नेऊन त्यावर प्रक्रीया करून तयार होणारा पक्का माल भारतात विकु लागले. ख–या अर्थाने शेतक–याच्या शोषणाला येथुन सुरूवात झाली. शेतक–याची अवस्था अतिशय दैनिय झाली या संबंधीचे विचार ब्रिटीश काळात विविध विचारवंतांनी मांडले. स्वातंत्र्यानंतरही शेतक–यांच्या परिस्थितीत परिवर्तन घडुन येईल अशी अपेक्षा होती पण तसे झाले नाही. उलट स्वातंत्र्यापूर्वीची परिस्थिती चांगली होती अशी म्हणण्याची वेळ शेतक–यावर आली आहे. शेतक–यांची दैयनिय स्थिती हा विषय चिंतेचा व चिंतनाचा झाला आहे.

आज भारताची लोकसंख्या ही जागतिक लोकसंख्येच्या 17. 5 टक्के इतकी पण भूभागाचा विचार करता जागतिक 17.5 टक्के इतकी पण भूभागाचा विचार करता जागतिक भुभागाच्या फक्त 2.4 टक्के भूभाग भारताच्या वाट्याला आला आहे. त्यातील कसण्याजोग्या धारणा क्षेत्राचा विचार केल्यास ते आणखीण कमी होते. आज देशातील 2/3 जनतेचे जगण्याचे साधन प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या शेती हे आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या 57 टक्के जनता प्रत्यक्षरित्या शेतीवरती अवलंबून आहे. देशाच्या जी.डी.पी. मध्ये भलेही शेतीचा वाटा 56 टक्के पासून 12 टक्के पर्यंत कमी झाला असेल तरीही शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेच्या पाठिचा कणा आहे. पण नियोजनात व धोरणात जो दर्जा उद्योगाना दिला तो शेतीला दिला गेला नाही. म्हणूनच शेती व शेतकरी यांची दूर्दशा झालेली दिसते. शेतक–यांना दूर्दैवाने आत्महत्त्या करावी लागते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

(1) शेतक–यांच्या आत्महत्या मागील कारणांचा शोध घेणे.
(2) शेतक–यांच्या आत्महत्त्येचे सामाजिक परिणाम विचारात घेणे.
(3) शेतक–यांच्या आत्महत्त्येवर उपाय शोधने.

**संशोधन पध्दती :**

संशोधन विशयाचा अभ्यास करण्यासाठी व्दितीय साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. व्दितीय साधनांच्या सहाय्याने माहितीचे संकलन केले आहे. शासनाची विविध साधनामध्ये उपलब्ध असलेल्या आकडेवारीचा संशोधनासाठी वापर करण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत अभ्यासासाठी तथ्य संकलन करण्याकरीता दुय्यम माहिती साधनाचा उपयोग केला आहे.यात प्रकाशीत साहित्याचा उपयोग केला आहे. यामध्ये संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमान पत्र इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**शेतक–यांच्या आत्महत्त्याची कारणे :**

शेतक–यांच्या आत्महत्त्या ह्या सरकारी कायदे, प्रशासनातील भ्रष्टाचार, दुष्काळ, अतिवृष्टी कर्जबाजारीपणा अशा अनेक कारणाने होत आहे. याचे सविस्तर विवेचन खालील प्रमाणे आहे.

**(1) असंतुलीत विकास :**

भारताला 1947 ला स्वातंत्र्य मिळाले स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनेच्या सहाय्याने भारताने प्रगती केली. प्रगती करतांना कृषी क्षेत्राला दुय्यम स्वरूपाची वागणुक देण्यात आली. यामुळे इतर क्षेत्राच्या तुलनेत शेती अविकसीत राहिली. इतर क्षेत्रातील लोकांच्या तुलनेत शेतक–याचे उत्पन्नही अल्प स्वरूपाचे राहीले. शेतकरी

*श्री बाबासाहेब धाबेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, रिसोड, जिला-वाशिम ( महाराष्ट्र )*

**महाराष्ट्रातील शेतक–यांच्या आत्महत्त्या**
**(सन 1995 ते 2015)**

| अ. क्र. | वर्ष | आत्महत्त्या केलेल्या शेतक–यांची संख्या | अ. क्र. | वर्ष | आत्महत्त्या केलेल्या शेतक–यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1995 | 1086 | 2 | 1996 | 1981 |
| 3 | 1997 | 1917 | 4 | 1998 | 2409 |
| 5 | 1999 | 2023 | 6 | 2000 | 3032 |
| 7 | 2001 | 3536 | 8 | 2002 | 3695 |
| **9** | 2003 | 3636 | 10 | 2004 | 4147 |
| **11** | 2005 | 3926 | 12 | 2006 | 4453 |
| **13** | 2007 | 4238 | 14 | 2008 | 3802 |
| **15** | 2009 | 2872 | 16 | 2010 | 3141 |
| **17** | 2011 | 3337 | 18 | 2012 | 3786 |
| **19** | 2013 | 3146 | 20 | 2014 | 5650 |
| **21** | 2015 | 3228 | | **एकुन** | **60750** |

आपल्या दैनंदीन गरजा भागवु शकेल एवढेही उत्पन्न त्याला मिळेनासे झाले. यातून निराशा होवून शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत.

**(2) शेती मालाचा हमी भाव :**

केंद्र सरकारच्या शेतीविषयक धोरणामुळे शेतकरी चोहोबाजुने नागावला जात आहे. सन 2015–16 मध्ये तुरीचा भाव 11,000 रू. प्रती क्वींटल होता तो आज सन 2016 – 17 मध्ये 4000 रू. झाला आहे. शेशे तक–याकडे साठवणुकीची क्षमता नसल्यामुळे व पैशाची नितांत गरज असल्यामुळे तो पिक काढणी झाली की, शेतमाल विकतो. व्यापारी हा शेतमाल कमी भावाने खरेदी करतात व नंतर जास्त भावाने बाजारात विकला जातो. शेतीमालाच्या भावाचे चढउतार हे शेअर बाजार व सोने यांच्या पेक्षा जास्त पटीने होतात. दररोज 800 ते 1000 रू. भावात चढ–उतार होतो व यातूनच शेतक–यांची माणसीकता बिघडते.

**(3) अपुरी शासकीय यंत्रणा :**

हमी भावाने शेतमाल खरेदी करण्यासाठी शासनाकडे असलेली यंत्रणा अपुरी आहे. सध्या महाराष्ट्रात नाफेडतर्फे तुर खरेदी केंद्र सुरू आहे. तिन तालुके मिळुन एक खरेदी केंद्र आहे. शेतक–यांच्या मालाचे वजन करण्यास एक महिना लागुन धनादेश मिळण्यासाठी 15 दिवस लागतात. शेतक–याचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत नसल्यामुळे पुन्हा त्यांच्या समोर अडचणी निर्माण होतात. आवश्यक गरजेतुन विकलेल्या मालाचे पैसे मिळण्यासाठी 3 ते 4 महिन्याचा कालावधी लागतो. या अपु–या शासकीय यंत्रणेमुळे शेतकरी त्रस्त होतो.

**(4) कर्जबाजारीपणात वाढ :**

भारतात शेती क्षेत्राला पत पुरवठ्याबाबतीत सुरूवातीपासूनच दुय्यम स्थान दिले आहे. शेतक–यांना लवकर कर्ज मंजुर होत नाही, झालेच तर व्याजदर अधिक असते. वेळेवर कर्ज मिळत नाही म्हणुन भारतीय शेतकरी खाजगी सावकाराकडून कर्ज घेतो. भारतीय शेतक–याबाबत एक सर्व परिचित म्हण आहे – ''भारतीय शेतकरी हा कर्जातच जन्मतो व कर्जातच मरतो'' शेतकरी कर्ज बँकेकडून घेवून ते मुलीचे विवाह व इतर अनुत्पादक कार्यासाठी वापरतात अनुत्पादक कार्यासाठी वापरल्यामुळे त्यांचे कर्ज थकबाकीत जाते. बँकेची थकबाकी वाढली की, ते खाजगी सावकराकडून कर्ज घेतात. खाजगी सावकाराचे व्याजदर ही प्रतीवर्ष 60 ते 70 टक्के एवढे असते. यामुळे शेतक–यावर कर्जाचा बोझा वाढतो. घेतलेले कर्ज एका वर्षात दुप्पट होते, यामुळे तो आत्महत्त्येकडे वळतो.

**(5) शेतीची कमी उत्पादकता :**

भारतीय शेतीच्या तुलनेत इतर देशाच्या पिकाची उत्पादकता जास्त आहे. भारतात यांत्रिकीकरणासाठी शेतक–याजवळ भांडवल नाही. भारतात कृषी संशोधनाकडे दुर्लक्ष झाले आहे. जास्त उत्पादन देणा–या नविन जाती विकसीत झाल्या नाहीत तसेच वाढत्या लोकसंख्येमुळे जमिनीचे लहान तुकड्यात विभाजन झाले यामुळे शेतीची उत्पादकता कमी झाली आहे. शेतीच्या कमी उत्पादकतेमुळे शेतक–यांचे उत्पन्न कमी होते. त्याचे लागत मुल्य सुध्दा त्याला मिळत नाही.

**(6) दारिद्रय :**

भारतात लहान व मध्यम शेतक–यांची संख्या जास्त आहे. त्यातही अल्पभूधारक व अत्यल्पभूधारकांची संख्या जास्त आहे. शेतीचे क्षेत्र कमी असल्यामुळे यांत्रिकीकरण, आधुनिक खते, बियाणे याचा वापर भारतीय शेतकरी करू शकत नाही. त्यामुळे त्याचे उत्पन्न कमी येते. यातून त्याचे दारिद्रय वृध्दींगत होते.

**(7) चुकीचे आयात–निर्यात धोरण :**

शहरी मध्यम वर्गीयांना स्वस्तात अन्नधान्य, भाजीपाला, या शेतीशी संबंधीत वस्तु मिळाव्यात म्हणून सरकार भारतीय कृषी मालावर चुकीची निर्यातबंदी लादतात. या वस्तुवर निर्यात बंदी लादण्यासाठी या वस्तु जीवनावश्यक वस्तुच्या यादीत टाकल्या आहेत. निर्यात बंदी करून शासनाने शेतमालाचे भाव पाडण्याचे काम केले आहे. याउलट डब्ल्यु टि ओ च्या करारानुसार शेती क्षेत्रातील आयात मुक्त केली आहे. आयात शुल्क कमी करण्यात आले आहे. त्यामुळे कापुस, मका, सोयाबीन इत्यादी वस्तु कमी किमतीत भारतीय बाजार पेठेत दाखल झाल्या आहेत. अमेरीके सारख्या विकसीत देशातील शेतीमालाशी भारतीय शेतकरी स्पर्धा करू शकत नाही. कमी किंमतीत माल विकल्यामुळे शेतक–यांचा तोटा होतो, हा तोटा सहन न झाल्यामुळे भारतीय शेतकरी आत्महत्त्या करतो.

**(8) धर्म व रूढी परंपरा :**

भारतीय शेतकरी हा धर्मनिष्ठ आहे, त्याचा धर्मातील रूढीवर विश्वास आहे. शेतीकडे व्यवसाय म्हणून न पाहता काळ्या आईची सेवा या नजरेने शेतीकडे पाहतो. शेतीतून मिळालेले उत्पन्न तो सण, उत्सव व सामाजिक परंपरासाठी खर्च करतो. मिळणा–या उत्पन्नाचा भांडवल म्हणुन उपयोग करत नाही. पर्यायाने त्याच्या जवळ भांडवलच शिल्लक राहत नाही. भांडवल न उभारल्यामुळे त्याला गुंतवणुक करता येत नाही. गुंतवणुक नसल्यामुळे त्याच्या उत्पन्नात वाढ होतांना दिसून येत नाही.

**(9) सिंचनाचा अभावा :**

भारताला स्वातंत्र्य मिळुन 70 वर्षे झाली तरीही भारतातील 30 टक्के शेती सिंचनाखाली आहे. आजही 70 टक्के शेती कोरडवाहू आहे. ती निसर्गाच्या लहरीवर अवलंबुन आहे. भारतात ब–याचवेळा अनियमित पाऊस कोरडा दुश्काळ पडतो. त्यामुळे उत्पादन कमी येते. शेतक–याने गुंतवलेले पैसे सुध्दा उत्पन्नातून निघत नाही भारतात सिंचनावरील अनुदान शासनाने कमी केले आहे. या सर्वाचा परिणाम शेतक–यांच्या मानसिकतेवर होवून तो आत्महत्त्या करतो.

**(10) शेतक–याचे अज्ञान :**

भारतीय शेतक–यामध्ये आजही मोठ्या प्रमाणात अज्ञान आहे. आजच्या डिजीटल योगात माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतीत आधुनिकीकरण आणने शक्य असतांनाही शेतकरी हे नविन तंत्रज्ञान

वापरतांना दिसत नाही. या नविन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने बाजार पेठेचा अभ्यास करता येतो. परंतु अज्ञानामुळे भारतीय शेतकरी जगाच्या बाजारपेठेचा अभ्यास करू शकत नाही.

**उपाय :**

**(1) शाश्वत सिंचनावर भर :**

सिंचन क्षेत्रात वाढ होण्यासाठी शाश्वत सिंचनावर भर देणे आवश्यक आहे. सिंचनाची क्षमता वाढल्यास शेतीचे उत्पादन वाढेल. शेतक–यांना वर्षातून दोन पिके घेता येतील. यातून शेतक–याचे आर्थिक उत्पन्न वाढेल.

**(2) उत्पादन खर्चावर आधारीत हमी भाव :**

स्वामीनाथन समितीने केलेल्या शिफारसी प्रमाणे उत्पादन खर्च अधिक 50 टक्के नफा असा प्रत्येक शेतमालाला शासनाने हमी भाव द्यावा. नुसता हमीभाव जाहीर न करता शासनाने हमी भावानुसार शेतमाल खरेदी करण्याची व्यवस्था निर्माण करावी, जेणे करून शेतक–यांना त्यांचा माल विकुन नफा मिळविता येईल. यामुळे आत्महत्त्या करण्याचा विचार त्याच्या मनात निर्माण होणार नाही.

**(3) पारदर्शी पिक विमा योजना :**

केंद्र शासनाने पंतप्रधान पिक विमा योजना घोषीत केली आहे, परंतु ही विमा योजना खाजगी कपन्याकडे राबविण्यासाठी दिली आहे. या कंपन्या स्वतःच्या नफ्यासाठी अनेक जाचक अटी लावतात त्यामुळे शेतक–यांना पिकाचे झालेले नुकसान विम्यातून मिळतच नाही शेवटी शासनाला हस्तक्षेप करून शेतक–यांची कर्ज माफी करावी लागते. शासनाने पिक विमा योजना स्वतः राबविल्यास त्याचा फायदा शेतक–यांना होईल.

**(4) सहकारी संस्थानची उभारणी :**

शेतक–याने उत्पादीत केलेल्या कच्च्या मालावर प्रक्रीया करण्यासाठी सहकारी तत्त्वावर दुग्ध डेअरी, दालमिल, सेंद्रीयखत निर्मिती उद्योग, सुत गिरणी, शेतीमालावर आधारीत विविध उद्योगांची निर्मिती करणे गरजेचे आहे. यासाठी शासनाने आर्थिक अनुदान द्यावे.

**(5) विपनन प्रक्रीयेत सुधारणा :**

शेत मालाच्या खरेदी विक्रीत अनेक तृटी आहेत. भारतात शेत माल उत्पादक हे आपल्या मालाची किंमत स्वतः न ठरविता खरेदीदार, दलाल, आडत व्यापारी मालाची किंमत ठरवतात यातून शेतक–याचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान होते. या करीता शासनाने योग्य यंत्रणेची निर्मिती करून यावर शासनाने नियंत्रण ठेवावे.

**(6) वित्त पुरवठा :**

दुष्काळामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. त्याच्याकडे बँकाचे व सावकाराचे असलेले कर्ज तो फेडू शकत नाही, त्यामुळे शासनाने त्याचे कर्ज माफ करून नविन कर्ज कमी व्याज दराने त्याला उपलब्ध करू द्यावे.

**(7) शितगृहाची निर्मिती :**

शेतक–याने निर्माण केलेल्या मालाला योग्य भाव न मिळाल्यास ते शितगृहात ठेवण्यासाठी शेतक–याकडे कोणतीच व्यवस्था नाही. शेतकरी आपला माल उघड्यावर ठेवतो. यातून त्याच्या मालाचे नुकसान होते व भाव कमी मिळतो. शासनाने शितगृहाची निर्मिती करून शेतक–यांना उत्पादीत माल मोफत ठेवण्याची व्यवस्था करावी.

**(8) गोदामाचे बांधकाम :**

शेतक–यांना शेतमाल साठविण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत गोदामे बांधावीत जेणेकरून शेतकरी आपला माल या गोदामात साठवेल. योग्य भाव मिळताच तो बाजारात हा माल विकु शकेल. यातून शेतक–याची आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल.

**(9) जोडधंद्याचा विकास :**

शेतीला जोडधंद्याची साथ देवून शेतक–यांना नियमित व हमीचे उत्पन्न मिळण्यासाठी दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन, शेळी पालन या सारख्या जोड व्यवसायाला भांडवल पुरविणे, सवलती देणे या सारख्या योजना शासनाने तयार करणे गरजेचे आहे.

**(10) सामुदायिक विवाह सोहळे :**

शासनाने तालुका पातळीवर दरवर्शी शेतक–याच्या मुला–मुलीचे सामुहिक विवाह सोहळे आयोजीत करावे. हे आयोजीत करणा–या सामाजिक संस्थांना मोठ्या प्रमाणात अनुदाने द्यावेत. सामुदायिक विवाह सोहळ्यातील विवाहांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. सामुहिक विवाह सोहळ्यामुळे शेतक–याचा होणारा अनावश्यक खर्च कमी होईल.

**सारांश :**

शेतकरी आत्महत्त्या हा एक सामाजिक प्रश्न आहे. शेतक–याच्या आत्महत्त्येची अनेक कारणे आहेत. शेतक–यांच्या आत्महत्त्येमुळे त्याच्या कुटुंबावर व समाजावर विपरीत परिणाम होतो. शासनाने विविध उपाययोजना केल्या असल्या तरी त्याचा कोणताच फायदा शेतक–याची आत्महत्त्या थांबण्यासाठी झाला नाही. आर्थिक अडचण ही शेतक–याच्या आत्महत्त्येला पर्याय होऊ शकत नाही. केवळ कर्जमाफी देवून हा प्रश्न सोडविला जाऊ शकत नाही, यासाठी शासनाने शेतीच्या समृध्दीकरीता विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. शासनाच्या उपाय योजने सोबतच शेतक–यांनी स्वतःची मानसिकता बदलविणे आवश्यक आहे. सरकारकडून मिळालेल्या प्रत्येक सुविधेचा वापर उत्पादन वाढीसाठी केला पाहिजे. भारतीस शेतीसमोरील सर्वात मोठे संकट मान्सुनची अनिश्चितता व हवामानातील बदल हे आहे. त्याकरीता या संकटावर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जलसिंचन सुविधा निर्माण करण्यावर शासनाकडून भर देणे आवश्यक आहे. तसेच हवामानातील बदलानुसार पिक रचनेत बदल करण्याबाबत शेतक–यांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. कृशी क्षेत्राला आवश्यकत्या प्रमाणात भांडवल उपलब्ध करून देणे, सहकारी शेतीच्या सुत्राचा वापर करणे, निश्चित बाजारपेठ निर्माण करून कृषी विकासासाठी सर्वस्तरातून प्रयत्न करणे आवश्यक आहे.

***संदर्भ :***

*(1) रायकेलकर, डॉ. दामजी (2013) : भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक प्रकाशन, औरंगाबाद. **(2)** कवीमंडन, विजय (2012) : कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर. **(3)** पुरोहित, वसुधा (2016) : कृषी अर्थशास्त्र, विद्या बुक प्रकाशन, औरंगाबाद. **(4)** कायंदे पाटील. जी.वी. (2003) : कृषी अर्थशास्त्र, चैतन्य प्रकाशन, नाशिक. **(5)** कवीमंडन, व्हि. : कृषी अर्थशास्त्र, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर. **(6)** काळे संभाजी, खंदारे विलास : शेतकरी आत्महत्त्या, वास्तव आणि उपाय योजना. **(7)** महाजन अश्विनी : भारतीय अर्थव्यवस्था, एस. चंद्र प्रकाशन, नवी दिल्ली. **(8)** ढोबळे, विष्णु (2009) : शेतक–यांची आत्महत्त्या जागतिकीकरणातील शोकांतीका, सुगावा प्रकाशन, पुणे.*

❆ ❆